| | | |
|---|---|---|
| MHYA170002582022 | खटला दाखल तारीख | १४/०३/२०२२ |
| | पंजीकृत तारीख | १४/०३/२०२२ |
| | निकालाची तारीख | १३/०३/२०२६ |
| | कालावधी ०३ वर्षे, ११ महिने, २९ दिवस | |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळंब यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : ह.ना.पोले यांचे समक्ष)**
**न्यायनिर्णय घोषित दिनांक १३/०३/२०२६**
**(नियमीत फौजदारी खटला क्र. २६/२०२२)**

| | |
|---|---|
| | गुन्हा रजिष्टर क्र.१४/२०२२,<br>पोलीस ठाणे– कळंब, ता. कळंब, जि. यवतमाळ. |
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>कळंब पोलीस ठाणे,<br>ता.कळंब, जि. यवतमाळ. |
| अभियोगपक्षामार्फत | सहा.सरकारी अभियोक्ता–श्री. आर.आर.त्रिवेदी. |
| आरोपी | रामा गजानन सुरसकर<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>रा.कळंब, ता.कळंब, जि. यवतमाळ |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. डी.जी. तेलंगे |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १६/०१/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १६/०१/२०२२ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | १४/०३/२०२२ |
| दोषारोप निश्चीत दिनांक | ०५/०९/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११/०१/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | १३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १३/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – |

**<u>आरोपीची माहिती.</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील कलम | निर्दोष किंवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | खटल्यादरम्यान आरोपीने भोगलेल्या कारावासाचा कालावधी कलम ४२८फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामा गजानन सुरसकर | कलम ४१(अ) नुसार सुचना पत्रावर सोडले | १२/०४/२०२२ | ३२४, ५०४ भा.द.वि. | दोषी | आरोपीला परिविक्षा अधिनियम, १९५८ चे कलम ४ नुसार बंधपत्रावर सोडण्यात आले. | – |

## <u>भाग 'क'</u>

## (Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार.

अ. अभियोगपक्ष–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अभि. सा.क्र.०१ | धरती दिगांबरराव आसुटकर | फिर्यादी |
| अभि. सा.क्र.०२ | दिगांबर बापुराव आसुटकर | जखमी साक्षीदार |
| अभि. सा.क्र.०३ | वामन विठोबा कुबडे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अभि. सा.क्र.०४ | सुरज रविंद्र सुरतकर | पंच साक्षीदार |
| अभि. सा.क्र.०५ | संतोष पांडुरंग विधाते | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अभि. सा.क्र.०६ | सुनिल मारोतराव केवट | तपासीक अधिकारी |
| अभि. सा.क्र.०७ | डॉ.वंदना विलास महाजन | वैद्यकीय अधिकारी |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| आरोपी.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| न्याया.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

ड. अभियोग पक्षाने सिद्ध केलेले दस्त –

| अनु.क्रं | दस्त व निशाणी क्रमांक | कोणाद्वारे सिद्ध झाले |
|---|---|---|
| ०१. | फिर्याद व छापील फिर्याद (नि.क्र. १५ व १६) | सा.क्र.०१ धरती – फिर्यादी |
| ०२. | घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. २८) | सा.क्र.०४ सुरज– पंच साक्षीदार |
| ०३. | जप्ती पंचनामा (नि.क्र. २९) | सा.क्र.०४ सुरज– पंच साक्षीदार |
| ०४. | वैद्यकीय अधिकारी यांना अभिप्राय मिळणेकामी दिलेले पत्र (नि.क्र. ३४) | सा.क्र.०६ केवट– तपासीक अंमलदार |
| ०५. | वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र. ३७) | सा.क्र.०७ डॉ. महाजन– वैद्यकीय अधिकारी |

इ. बचावपक्षाने सिद्ध केलेले / मान्य केलेले दस्त–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ई. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

उ. मुद्देमाल–

| अनु.क्र. | निशाणी क्र./आर्टीकल क्र. | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | एक बांबूची काठी |

## न्या य नि र्ण य

## (अधिघोषित दिनांक १३/०३/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकीकत खालीलप्रमाणे आहे** :–

**०२**. फिर्यादी नामे धरती दिगांबरराव आसुटकर व आरोपी हे कळंब येथील रहिवासी आहे. दिनांक १६/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०८.०० वाजता फिर्यादीचे पती नेहमीप्रमाणे घराजवळील कुंडलिक चांदोरे यांचे घराजवळ वामन कुबडे, डफडे, विस्तव शेकत असतांना आरोपी रामा हा दारु पिवुन विस्तवाजवळ आला व शिवीगाळ करु लागला. फिर्यादीचे पतीने विनाकारण शिवीगाळ का करतो असे म्हटले असता आरोपीने त्याचे घरी जावुन लाकडी काडी आणली व विस्तव शेकत असलेल्या त्यांचे पतीला तोंडावर, नाकावर, डोक्यावर व पाठीवर मारहाण करुन जखमी केले. वामन कुबडे, डफडे व संतोष विधाते यांनी आरोपीचे तावडीतुन सोडवुन ग्रामीण रुग्णालय कळंब येथे उपचाराकरिता घेवुन गेले. डॉक्टरांनी उपचार करुन पुढील उपचाराकरिता यवतमाळ येथे रेफर केले. त्यामुळे त्यांनी घटनेची फिर्याद पोलीस ठाणे, कळंब येथे नोंदवली.

**०३**. सदरील फिर्याद वरुन पोलीस ठाणे, कळंब, जि. यवतमाळ येथे गु.र.क्र.१४/२०२२ कलम ३२४, ५०४ भा.दं.वी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४**. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ५०४ अन्वये (नि.क्र.१२) वर दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपीवर लावण्यात आलेले

आरोप त्यांनी नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे निवेदन (नि.क्र.३०) नोंदवण्यात आले. त्यामध्ये त्यांनी खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

**०५.** अभियोगपक्षाचे कथन विचारात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आले. त्यावर मी खालीलप्रमाणे कारण–मिमांसेनुसार निष्कर्ष नोंदविले आहेत.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) दिनांक १६/०१/२०२२ रोजी संध्याकाळी मौजे कळंब येथे आरोपीने फिर्यादी यांना काठीने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत करुन भा.द.वि.चे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | अभियोगपक्षाने भा.द.वि. कलम ३२३ अन्वये गुन्हा सिद्ध केला. |
| २) वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन सार्वजनिक शांतता भंग केली व भा.द.वि.चे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? | नकारार्थी. |
| ३) आदेश काय ? | ...अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

**०६.** अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीला काठीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व शिवीगाळ करुन सार्वजनिक शांतता भंग केली, ही बाब संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

**मुद्दा क्र.०१ ते ०३ करीता :–**

**०७.** सदरील गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे एकूण ७ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. विद्वान सरकारी वकीलांनी असा युक्तिवाद केला की, सदर घटनेमध्ये साक्षीदार क्र.०२ दिगंबर हे जखमी असुन त्यांनी तंतोतंत फिर्यादमध्ये नमुद असलेल्या घटनाक्रमाबाबत साक्ष दिलेली आहे. त्यांच्या साक्षीला साक्षीदार क्र.०५ संतोष यांनीसुध्दा पूरक साक्ष दिलेली आहे. या

व्यतिरिक्त झालेली घटना व सदर घटनेमध्ये साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांना झालेली इजा या पुराव्याला वैद्यकीय अधिकारी साक्षीदार क्र.०७ डॉ.महाजन यांच्या साक्षेची सुध्दा जोड आहे. प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या विश्वासार्हतेबद्दल संशय निर्माण व्हावा अशा कोणत्याही बाबी उलटतपासातुन पटलावर आलेल्या नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द केलेला आहे.

०८. याउलट, आरोपीचे विद्वान वकील श्री. डी.जी.तेलंगे यांनी असा युक्तिवाद केला की, अभियोगपक्षातर्फे स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. तपासलेले साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. घटनास्थळावरील फिर्याद मध्ये नमूद असलेले व्यक्ती सा.क्र.०३ नामे वामन यांनी अभियोगपक्षाला पूरक अशी साक्ष दिलेली नाही. या व्यतिरिक्त साक्षीदार क्र.०२ दिगंबर व फिर्यादी हे नवरा–बायको आहेत. तसेच साक्षीदार क्र.०५ संतोष हे फिर्यादीचे परिचीत आहेत. त्यामुळे हे सर्व साक्षीदार घटनेमध्ये स्वारस्य असलेले साक्षीदार आहेत. या व्यतिरिक्त कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदवलेली नाही. त्यामुळे घटनाक्रमाबद्दल संशय निर्माण होतो.

०९. सदर युक्तिवादाबाबत या ठिकाणी नमूद करण्यात येते की, भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १३४ नुसार साक्षीदारांची संख्या न पाहता साक्षीदारांच्या साक्षीची गुणवत्ता बघणे गरजेचे आहे असे नमूद करण्यात आलेले आहे. केवळ काही साक्षीदार फितूर झाले केवळ ही एक बाब अभियोगपक्षाच्या खटल्याविरुद्ध अनुमान काढण्यास पुरेशी ठरु शकत नाही. अभिलेखावर आलेला एकंदरीत पुरावा, जखमी साक्षीदाराची साक्ष, वैद्यकीय पुरावा व आरोपी पक्षाने पटलावर आणलेल्या बाबी व त्यांचा बचाव समर्पक आहे किंवा नाही हे सुद्धा बघणे तितकेच महत्वाचे ठरते.

१०. सदर घटनेतील साक्षीदार क्र.०२ या प्रकरणातील जखमी साक्षीदार आहे. जखमी साक्षीदाराच्या साक्षीस कायद्यात विशेष महत्व दिलेले आहे. जखमी साक्षीदाराची साक्ष त्याला झालेल्या जखमांबाबत व दुखापतींबाबत सुसंगत आहे

किंवा नाही हे सुद्धा पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे या ठिकाणी जखमी साक्षीदार म्हणजेच फिर्यादीच्या पतीचे साक्षीचा उहापोह करणे आवश्यक ठरते. फिर्यादीचे पती साक्षीदार क्र.०२ यांनी अशी साक्ष दिली आहे की, दिनांक १६/०१/२०२२ रोजी रात्री ०८.०० वाजता कुंडलिक चांदोरे यांच्या घराजवळ ते व वामन कुबडे असे शेकोटी शेत असताना आरोपी हा तिथे दारु पिवुन आला व त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी हा घरी गेला व पुन्हा हातात काठी घेवुन त्यांचेकडे आला व त्यांना तोंडावर, नाकावर, डोक्यात व पाठीवर काठीने मारुन दुखापत केली. संतोष विधाते यांनी सोडवासोडव केली. त्यांचे पत्नीने फिर्याद नोंदवली. पोलीसांनी उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय कळंब येथे नेले व पुढील उपचाराकरिता शासकीय रुग्णालय, यवतमाळ येथे रेफर केले. या ठिकाणी आरोपीचा बचाव सुद्धा बघणे आवश्यक आहे. त्यासाठी उलटतपासादरम्यान आरोपी पक्षाने असे पटलावर आणण्याचा प्रयत्न केला की, जखमी हा रस्त्यावरुन वळण घेत असतांना मोटरसायकलवरुन नालीत पडला व त्यास दुखापत झाली. या संदर्भातील सर्व सूचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तर दिले.

**११.** सदर प्रकरणामध्ये फिर्यादीची साक्ष व प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१५) यांचे अवलोकन केले असता, फिर्यादीने फिर्याद (नि.क्र.१५) मधील कथनांची मिळती जुळती साक्ष दिली असल्याचे दिसून येते. परंतु उलटतपासादरम्यान घटनेची माहीती त्यांना संतोष विधाते यांनी दिली, त्या घरात असल्यामुळे त्यांना घराबाहेर घडलेल्या घटनेची माहीती स्वतः झाली नाही, या दोन बाबी आरोपीपक्षाने पटलावर आणलेल्या आहेत. त्यामुळे सदर साक्षीदार यांनी मारहाणीची घटना प्रत्यक्ष बघितली नसल्याचे दिसून येते. परंतु त्यांनी साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांना झालेल्या जखमा बघितल्या नाहीत अशी कोणतीही कबुली पटलावर आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही फौजदारी प्रक्रिया कार्यान्वीत करणे या बाबीवर निगडीत असल्याचे दिसून येते.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ वामन व साक्षीदार क्र.०५ संतोष यांना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले आहे. परंतु साक्षीदार क्र.०३ यांनी प्रत्यक्ष घटनेबाबत साक्ष दिलेली नाही. परंतु ते घरी जात असतांना आरोपी व फिर्यादी यांचे भांडण सुरु होते ही बाब मात्र त्यांनी सरतपासात सांगितली आहे. याउलट, आरोपी व साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांच्यामधील भांडण साक्षीदार क्र.०५ संतोष यांनी सोडवले असे साक्षीदार क्र.०२ दिगंबर व फिर्यादी यांनी साक्षेदरम्यान सांगितलेले आहे. त्यामुळे साक्षीदार क्र.०५ संतोष यांच्या साक्षीचा उहापोह करणे याठिकाणी आवश्यक ठरते.

**१३.** साक्षीदार क्र.०५ संतोष यांच्या साक्षेमध्ये असे आले आहे की, सन २०२२ साली रात्री ७.०० ते ७.३० दरम्यान चांदोरे यांचे घराजवळ व्यास लेआउट मध्ये घटना घडली होती. त्यादिवशी ते व इतर व्यक्ति थंडी असल्यामुळे विस्तव शेकत बसले होते. आरोपी तेथे आला व त्याने साक्षीदार क्र.०२ दिगंबर याला शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी त्याच्या घरी गेला व काठी घेवुन तेथे आला. त्यानंतर आरोपीने दिगंबर याला काठीने पाठीत, डोक्यात व नाकावर मारहाण केली. त्यानंतर त्याने सदर भांडण सोडवले. उलटतपासादरम्यान आरोपी व जखमी त्यांचे परिचित आहे व आरोपीला दारु पिण्याचे व्यसन आहे ही बाब त्यांनी मान्य केली. इतर प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**१४.** सदर साक्षीदाराच्या साक्षेप्रमाणे सदर घटना ही व्यास लेआउट कळंब येथे घडली होती. सदर घटनास्थळाच्या बाबतीत साक्षीदार क्र.०४ सुरज यांनी सुध्दा घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२८ त्यांचेसमोर तयार करण्यात आला होता अशा प्रकारची साक्ष दिलेली आहे. घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२८ मध्ये सुध्दा घटनास्थळ हे मौजा कळंब हद्दीतील व्यास लेआउट मधील चांदोरे यांचे घराजवळ दर्शविण्यात आलेले आहे. तसेच साक्षीदार क्र.०६ तपासी अंमलदार केवट यांनीसुध्दा घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२८ हा व्यास लेआउट येथे करण्यात आला होता अशी साक्ष दिलेली आहे. साक्षीदार क्र.०४ सुरज व साक्षीदार क्र.०६ केवट

यांचे साक्षेतून घटनास्थळाबाबत संशय निर्माण व्हावा अशा कोणत्याही कबुली पटलावर आलेल्या नाहीत. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२८ मधील तथ्ये सदर प्रकरणात शाबित झाले आहे.

**१५.** सदर प्रकरणामध्ये आरोपीपक्षाचा बचाव असा आहे की, साक्षीदार क्र.०२ दिगंबर हे गाडीवरुन जात असतांना नालीमध्ये पडले व त्यांना इजा झाली परंतु त्या आशयाच्या कोणत्याही प्रश्नांना फिर्यादी, साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांनी होकारार्थी उत्तरे दिलेली नाही. त्यामुळे केवळ उलटतपासादरम्यान सुचवलेल्या प्रश्नांना समर्पक बचाव असे या ठिकाणी ठरवता येणार नाही. साक्षीदार क्र.०३ वामन यांच्या हजेरीबाबत फिर्यादमध्ये व साक्षीदार क्र.२ दिगंबर यांच्या साक्षेमध्ये नमुद करण्यात आलेले आहे. परंतु त्यांनी मारहाणीच्या नेमक्या घटनेबद्दल स्पष्टपणे साक्ष दिलेली नाही. परंतु आरोपी व साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांच्यामध्ये भांडण सुरु होते हे मात्र या साक्षीदाराने सांगितलेले आहे. या ठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, साक्षीदाराने अभियोगपक्षाला पूरक अशी साक्ष दिलेली नाही अथवा साक्षीदार फितूर झाला ही बाब साक्षीदाराचा पुरावा पुर्णपणे दुर्लक्षित करण्यासारखा नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीतून आरोपीच्या विरुध्द व अभियोगपक्षास पूरक असलेल्या बाबी नक्कीच विचारात घेता येतील. सदर साक्षीदारच्या साक्षेतून घटनेबाबत जरी पुरावा आला नसला तरी घटनेच्या वेळी आरोपी व साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांची घटनास्थळावरील हजेरी व त्यांचेमध्ये भांडण झाले ही बाब अढळ होते.

**१६.** या व्यतिरिक्त वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.०५ संतोष यांनी भांडणामध्ये सोडवासोडव केली अशी साक्ष फिर्यादी व साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांनी दिलेली आहे. तसेच फिर्याद नि.क्र.१५ मध्ये सुध्दा संतोष हे घटनास्थळावर उपस्थित होते हे नमुद करण्यात आलेले आहे. आरोपीपक्षातर्फे त्यांचे साक्षेवर संशय निर्माण करण्यासाठी केवळ आरोपीस दारु पिण्याचे व्यसन आहे व आरोपीने त्यांच्या मोहल्ल्यातुन घर सोडुन निघुन जावे अशी त्यांची इच्छा होती या दोन कबुली

पटलावर आणलेल्या आहेत. या दोन्हीही शक्यता खऱ्या आहेत असा जरी एका क्षणासाठी विचार केला तरी मारहाणीबाबतचा मौखिक पुरावा दुर्लक्षित करण्यासाठी पुरेसा नाही. या ठिकाणी सदर साक्षीदार खरोखर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे किंवा नाही ही सर्वात महत्वाची बाब आहे. वर नमुद केल्याप्रमाणे सदर साक्षीदाराची हजेरी फिर्यादमध्ये, फिर्यादीच्या व साक्षीदार क्र.०२ यांच्या साक्षेमध्ये अधोरेखांकीत करण्यात आलेली आहे. त्यांच्या उपस्थितीबद्दल कोणत्याही आक्षेपार्ह बाबी उलटतपासातुन पटलावर आलेल्या नाहीत. मारहाणीची घटनेबाबत पुरावा बघितला असता आरोपीने साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांना काठीने डोक्यात, नाकावर व पाठीवर मारहाण केली अशी साक्ष पटलावर आलेली आहे. तसेच त्याआधी ते सर्व विस्तव शेकत बसले होते, ही बाब सुध्दा साक्षीदाराने सांगितलेली आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही विश्वासार्ह वाटते.

**१७.** फिर्यादीने व साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान झालेल्या जखमेबाबत साक्ष दिलेली आहे. परंतु, त्यासाठी वैद्यकीय पुरावा सुसंगत आहे किंवा नाही हे सुद्धा बघणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने सदर खटल्यात सा.क्र.०७ वैद्यकीय अधिकारी डॉ. वंदना महाजन यांची साक्ष नोंदवली आहे. त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी असे सांगितले की, दिनांक १६/०१/२०२२ रोजी त्या ग्रामीण रुग्णालय, कळंब येथे कार्यरत होत्या. त्यादिवशी जखमी दिगंबर यांना पो.स्टे.कळंब यांनी संदर्भपत्र (नि.क्र.३६) नुसार उपचारासाठी दवाखान्यात पाठवले होते. तपासादरम्यान जखमी दिगंबरच्या खालील व वरील ओठावर, नाकावर, उजव्या हातावर, पाठीवर, डाव्या खांद्यावर साध्या स्वरुपाच्या जखमा आढळून आल्या. त्यानंतर त्यांनी पुढील अभिप्राय घेण्यासाठी जखमीला कान, नाक, घसा तज्ञाकडे पाठवले. तपासणीचे वेळी जखमीच्या नाकातून रक्त सुध्दा येत होते. निशाणी ३७ प्रमाणे त्यांनी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र जारी केले. निशाणी ३७ वरील जखमा हया ताज्या स्वरुपातील होती. तसेच, सदर जखमा हया कठीण व टणक वस्तुने होऊ शकतात असे मत सुद्धा साक्षीदाराने दिले आहे.

आरोपीपक्षातर्फे उलटतपासादरम्यान असे पटलावर आणण्याचा प्रयत्न झाला की, सदर जखमा हया व्यक्ती टणक व बोथट जागेवर पडल्यास होऊ शकतात. त्या संबंधीत प्रश्नांना साक्षीदाराने होकारार्थी उत्तरे दिली.

**१८.** वरील साक्षेच्या अनुषंगाने साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांचे साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यांनी सुध्दा त्यांचे पुराव्यामध्ये तोंडावर, नाकावर, डोक्यात व पाठीवर काठीने मारुन दुखापत केली असे सांगितलेले आहे. साक्षीदार क्र.०५ संतोष यांनीसुध्दा काठीने पाठीत, डोक्यात आणि नाकावर मारहाण झाली अशा आशयाची साक्ष दिलेली आहे. त्या अनुषंगाने जखमी प्रमाणपत्र (नि.क्र.३७) मधील जखमांची जागा तंतोतंत बरोबर असल्याचे दिसून येते. परिणामी साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांचे साक्षीला वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.३७) ने पुष्टी मिळते. त्यामुळे साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांना झालेल्या जखमा हया काठीने झाल्या हे सुद्धा निःसंशय सिद्ध होते.

**१९.** उपरोक्त चर्चेवरुन, फिर्यादी, सा.क्र.०२ दिगंबर, सा.क्र.०५ संतोष यांच्या साक्षीवरुन असे शाबीत होते की, आरोपीने लाकडी काठीचा वापर करुन फिर्यादीला दुखापत केली. याव्यतिरीक्त भा.द.वि कलम ३२४ नुसार गुन्हा सिद्धीसाठी आरोपीने सा.क्र.०२ दिगंबरला इच्छापूर्वक दुखापत केली हे सुद्धा सिद्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार फिर्यादी, सा.क्र.०२ दिगंबर, सा.क्र.०५ संतोष यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदारांनी मारहाणीची घटना होण्या अगोदरची परिस्थिती व आरोपीची आधी शिवीगाळ करणे व काठी आणल्यानंतर साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांना मारहाण करण्याची घटना तंतोतंतपणे नमूद केली आहे व त्यावरुन आरोपीने साक्षीदार क्र.०२ दिगंबर यांच्या डोक्यावर, चेहऱ्यावर व नाकावर काठीने प्रहार केला आहे. निश्चीतच सदर दुखापत ही चुकीने झाली असे कदापी म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपीने सा.क्र.०२ दिगंबर यांना हेतुपुरस्सर मारहाण केली व त्यामुळे सा.क्र.०२ दिगंबर यांना दुखापत झाली हे निःसंशयपणे सिद्ध होत आहे. परंतु, घटनेच्या वेळी सा.क्र.०२ दिगंबर

यांना इच्छापूर्वक दुखापत करण्यासाठी वापरलेले साधन हे घातक या प्रकारात मोडते किंवा नाही हे सुद्धा बघणे आवश्यक ठरते.

**२०.** गोळी मारण्याचे, भोसकण्याचे किंवा कापण्याचे कोणतेही साधन किंवा हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरले असता जे मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असे कोणतेही साधन वापरुन इच्छापूर्वक दुखापत केली तर ती भारतीय दंड संहिता कलम ३२४ च्या संज्ञेत मोडते. सदर प्रकरणामध्ये गुन्ह्यात वापरलेली काठी ही साक्षीदारांना पुराव्यादरम्यान न्यायालयासमोर दर्शवण्यात आलेली नाही. परंतु, सा.क्र.०६ तपासीक अंमलदार केवट यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या ३२ इंचाची काठी असे वर्णन नमूद केले आहे. परंतु त्या काठीची गोलाई व इतर विवरण त्यांच्या साक्षीमधुन पटलावर आलेले नाही. निश्चितच काठी ही गोळी मारण्याचे, भोकसण्याचे किंवा कापण्याचे हत्यार नाही. त्यामुळे सदर हत्यार हे साक्षीदारांना दाखवणे व न्यायालयासमोर आणणे क्रमप्राप्त होते. सदर हत्याराच्या अवलोकनाशिवाय तसेच, फिर्यादी, साक्षीदार तसेच वैद्यकीय अधिकारी यांना हत्यार दाखवल्याशिवाय सदर हत्यार जीवघेणे होते किंवा नाही असा निष्कर्ष या ठिकाणी काढता येणार नाही. यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार सा.क्र.०२ दिगंबर यांना झालेली जखम जरी साध्या स्वरुपाची असली तरी ज्या काठीने मार झाला ती काठी जीवघेणे हत्यार होती हे संशयापलीकडे सिद्ध होत नाही. परंतु, केवळ ही बाब आरोपीला दोषमुक्त करण्यासाठी पुरेशी नाही. गुन्ह्यात वापरलेले हत्यार हे जरी घातक हत्यार नव्हते हे जरी सिद्ध होत नसले तरी आरोपीने सा.क्र.०२ दिगंबर यांना इच्छापूर्वक दुखापत केली हे पुराव्यावरुन सिद्ध होत आहे. परिणामतः आरोपीविरुद्ध भा.द.वि. चे कलम ३२३ अंतर्गत अपराध सिद्ध होतो.

**२१.** सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम ५०४ अन्वये सुध्दा दोषारोप ठेवण्यात आलेला होता. त्यामध्ये आरोपीचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्याला प्रक्षोभित केले याबाबी सिध्द होणे आवश्यक होते. परंतु सर्वच

साक्षीदारांनी आरोपीने कोणत्या शिव्या दिल्या व साक्षीदारास कशाप्रकारे प्रक्षोभित केले याबाबतचा पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे भा.द.वि. कलम ५०४ अंतर्गतचा गुन्हा सिध्द झालेला नाही. उपरोक्त चर्चेवरुन मी मुद्दा क्र.०१ चे उत्तर भा.द.वि कलम ३२३ अंतर्गत गुन्हा सिद्ध झाला असे नोंदवतो. तसेच मुद्दा क्र.०२ चे उत्तर नकारार्थी नोंदवतो.

२२. आरोपीला शिक्षा सुनावण्यापूर्वी शिक्षेच्या मुद्यावर त्याचे म्हणणे ऐकून घेणे महत्वाचे आहे. आरोपीने असे कथन केले की, तो गरीब आहे. त्याचा हा पहिलाच अपराध आहे. त्याचे कुटुंब त्याच्यावर अवलंबून आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार नाही. आरोपीचे विद्वान वकील श्री तेलंगे यांनी असा युक्तिवाद केला की, घटनाक्रम बघता आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चा लाभ देण्यात यावा. याउलट विद्वान सरकारी वकील श्री. आर.आर.त्रिवेदी हे आरोपीने केलेल्या अपराधामुळे सा.क्र.०२ दिगंबर यांना दुखापत झालेली आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षेची मागणी त्यांनी केली.

२३. दोन्ही विद्वान वकीलांनी सुचवलेल्या बाबींवर विचार केला. या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, गुन्हा जरी गंभीर स्वरुपाचा असला तरी शिक्षा देताना तो कोणत्या परिस्थितीत व कोणत्या कारणासाठी घडला हे सुद्धा पाहणे गरजेचे आहे. सदर प्रकरणामध्ये सा.क्र.०२ दिगंबर यांना जरी शारिरीक त्रास भोगावा लागला तरी अपराध हा किरकोळ कारणावरुन घडलेला असल्याचे दिसून येते. आरोपीला शिक्षा दिल्यास ती शिक्षा केवळ त्याच्या पूरती मर्यादीत राहणार नसून त्याचा परिणाम त्याच्या कुटूंबाला सुद्धा भोगावा लागणार आहे. सदर प्रकरणामध्ये जिल्हा परिविक्षा अधिकारी यांचा अहवाल मागण्यात आलेला नाही. परंतु, आरोपी हा नियमितरित्या न्यायालयासमोर हजर होता. त्याची न्यायालयासमोरची वागणूक सुद्धा चांगली व शांततेची होती. त्यामुळे सदर आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चा लाभ देणे न्यायोचीत वाटते. त्यामुळे अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चे कलम ४ नुसार आरोपीला

तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्याऐवजी त्याला परिविक्षा अधिका–याच्या निरीक्षणाखाली १ वर्षाच्या कालावधीकरीता ठेऊन चांगल्या वर्तनुकीच्या बंधपत्राच्या हमीवर सोडणे न्यायोचित ठरेल. परंतु, आरोपीने अटी व शर्तीचा भंग केल्यास किती शिक्षा असेल हे सुद्धा या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. भा.द.वि कलम ३२३ मध्ये १ वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा १,००० रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंड द्रव्याची किंवा दोन्ही शिक्षा होतील. सदर प्रकरणामध्ये आरोपीने गुन्ह्याअगोदर कोणतीही तयारी अथवा कट रचलेला नव्हता. त्यामुळे सदर घटना अतिगंभीर स्वरुपाची म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपीला ६ महिन्याचा सक्तीचा कारावास, दंड रु.१,०००/– व दंड भरण्यास कसूर केल्यास १५ दिवसांची सक्तीची सजा न्यायोचित वाटते.

**२४.** त्याच वेळी सा.क्र.०२ दिगंबर यांना मारहाणीमध्ये झालेल्या शारिरीक दुखापतीची व त्याला झालेल्या मानसीक त्रास सुद्धा लक्षात घ्यावा लागेल. त्यामुळे सा.क्र.०२ दिगंबर यांना झालेल्या त्रासाबाबत नुकसान भरपाईचा आदेश देणे न्यायसंगत आहे. आरोपीला देखील त्याच्या कडून भविष्यात अशी कोणतीही कृती घडू नये यासाठी नुकसान भरपाईची रक्कम त्याच्या कडून भरुन घेउन कृतीला आळा घालणे गरजेचे वाटते. त्यामुळे आरोपीला रु.३,०००/– इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देणे योग्य वाटते. परिणामतः मी मुद्दा क्र.०३ च्या अनुषंगाने पुढील आदेश पारित करतो.

**–: आ दे श :–**

(१) आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(२) अन्वये कलम ३२३ भारतीय दंड संहितेच्या अपराधासाठी दोषी ठरवण्यात येऊन त्याला अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चे कलम ४ नुसार रु.१५,०००/– च्या चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्रावर जिल्हा परिविक्षा अधिकारी, यवतमाळ यांच्या निरीक्षणाखाली १ वर्ष कालावधी करीता ठेवण्यात येते. दरम्यानच्या काळामध्ये आरोपींनी बंधपत्राचा भंग केल्यास आरोपीने शिक्षा भोगण्याकरीता या न्यायालयात हजर रहावे.

(२) वर नमूद निर्देशानुसार सदर आरोपी हा १ वर्षाच्या कालावधीकरीता जिल्हा परिविक्षा अधिकारी, यवतमाळ यांच्या निरीक्षणाखाली अथवा त्यांनी निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांच्या निरीक्षणाखाली अटी शर्तीवर राहतील.

अ. आरोपीने जिल्हा परिविक्षा अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे हजर राहून त्यांचे नाव, रहिवास पुरावा, प्रस्तुत आदेशाची प्रत व त्यांनी दिलेल्या चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्राची प्रत त्यांच्याकडे हजर करावी.

ब. आरोपीने वर नमूद १ वर्षाच्या कालावधीमध्ये शांततेचे पालन करुन त्याच्या कडून पुन्हा कोणताही गुन्हा होणार नाही याची काळजी घ्यावी.

(३) आरोपीने फिर्यादीस रक्कम रु.३,०००/– न्यायालयात जमा करावी. ती रक्कम फिर्यादीस अपील कालावधी संपुष्टात आल्यावर देण्यात यावी.

(४) आरोपीने त्याचे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका न्यायालयाच्या स्वाधीन करावा.

(५) आरोपीने फौ.प्र.सं. च्या कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रु.१५,०००/- चे वैयक्तिक व जमानतदाराचे बंधपत्र द्यावे.

(६) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक बांबुची काठी हे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

(७) न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला मोफत देण्यात यावी. तसेच, एक प्रत जिल्हा परिविक्षा अधिकारी, यवतमाळ यांना माहितीस्तव पाठवण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित व निर्गमीत करण्यात आले.)

Sd/–
**(ह.ना.पोले),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कळंब, जि.यवतमाळ

दिनांक : १३/०३/२०२६
ठिकाण : कळंब.